Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# मराठी साहित्यातील कादंबरी वाङमयाची गुणवत्ता व मुल्यमापनः एक चिकित्सक अध्ययन

**प्रा. डॉ. रानमाळ पी.जी.**
मराठी विभाग,
अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना

**प्रस्तावनाः**

कादंबरी हा कथनात्मक वाङ्मयाचाच एक भाग असल्याने प्राचीन काळापासून चालत आलेल्या कथासाहित्याचेच ते एक विकसित रुप आहे असे मानावे लागते. पण अन्य कथात्मक वाङ्मयापासून त्याचे वेगळेपण किंवा व्यवच्छेदकत्व ठरविणे हे काहीसे कठीण काम आहे. सेंद्रिय एकता, वास्तवता किंवा व्यक्तिचित्रणादी घटकांचा विचार हे निकष कादंबरीची व्यवच्छेदकता स्पष्ट करण्यास पुरेसे ठरत नाहीत. ही व्यवच्छेदकता काही रुपात्मक वैशिष्ट्यांच्या आधारेच सांगता येते म्हणून कादंबरीच्या स्वरुपाचे विवेचन करताना 'ठराविक लांबीचे कल्पित कथात्मक गद्य' या व्याख्येपेक्षा अधिक असे काही व्यवच्छेदक लक्षण सांगता येत नाही. ठराविक लांबी असणे या मुद्यावर आपण लघुकथा व दीर्घकथा यापासून कादंबरी वेगळी काढू शकतो. भालचंद्र नेमाडे यांनी 'भाषिक अवकाश' ही संकल्पना वापरुन लघुकथा, दीर्घकथा, लघुकादंबरी यांच्यापासून कादंबरीचे असणारे वेगळेपण स्पष्ट केलेले आहे. 'लघुकथा हा कमी लांबीचा, चिंचोळा भाषिक अवकाश पुरवणारा, एकसुरी आशयसूत्रातून स्थलकालाचे संकुचित, म्हणून तीव्र संवेदन देणारा प्रकार आहे. दीर्घकथेत लांबी वाढते, अवकाश वाढतो तरी आशयसूत्र एकसूरीच राहते. लघुकथा व दीर्घकथा दोन्हीवर लांबीच्या कमाल मर्यादा आहेत' असे सांगून पुढे कादंबरीविषयी नेमाडे म्हणतात ''कादंबरीत ह्या प्रमाणात आशयसूत्रे व त्यांचे पदर अनेक असतात, ह्यामुळे अवकाश प्रदीर्घ व विस्तृत होतो. लघुकथा-दीर्घकथा यांच्या उलट कादंबरीवर लांबीच्या किमान मर्यादा असतात. व्यामिश्र आशयसूत्रांमुळे हा अवकाश स्थळ व काळ यांना व्यापून ह्यापलीकडचे वास्तव सूचवीत असतो. कादंबरीच्या ह्या कालातीत सूचकशक्तीमुळेच तिचा अवकाश कितीही मोठा असू शकतो.''

प्रदीर्घ व विस्तृत भाषिक अवकाश आणि व्यामिश्र आशयसूत्रे या नेमाडे यांनी मांडलेल्या संकल्पना स्वीकारल्यास आपली कादंबरीच्या स्वरुपाबद्दलची भूमिका अधिक लवचिक होते. प्रदीर्घ भाषिक अवकाश व व्यामिश्र आशयसूत्रे असणारी कोणतीही कथात्मक कृती मग ते महाभारत असो किंवा 'श्यामची आई' असो - कादंबरी या संज्ञेस पात्र ठरते. यावरुन नेमाडे यांनी स्वीकारलेली कादंबरीच्या स्वरुपाविषयीची भूमिका वि.का. राजवाडे यांच्या कादंबरीविषयक भूमिकेसारखीच व्यापक आहे असे दिसून येईल. प्रदीर्घ भाषिक अवकाश, आशयसूत्रांची व्यामिश्रता आणि विस्तृत संरचना या कादंबरीच्या रुप वैशिष्ट्यांबरोबरच भालचंद्र नेमाडे यांनी आशयाच्या सामाजिकतेला महत्त्व दिलेले आहे. त्यांच्यामते कादंबरीचा ''सामाजिक आशय विशाल असावा लागतो. एखाद्या समस्येचा पाठपुरावा तिच्या विविध संदर्भासकट मांडलेला असतो. एखाद्या पोटसमूहाचे, पोटसंस्कृतीचे तपशिलांसह दर्शन घडविलेले असते. संपूर्ण काळाचा किंवा समाजाचा छेद घेतलेला असतो. आशयसूत्रे बळकट असतात. पात्रे सलग उभी राहतात.''

कादंबरीच्या या कलात्मक गुणवत्तेचे किंवा तिच्या मूल्यमापनाचे निकष ठरविताना एकाहून अधिक निकषांचा वापर करावा लागतो ''समीक्षकाने एकाच वेळी अनेक नियम व निकष यांचा उपयोग केला तर तो वापरत असलेल्या मूल्यदंडात जरूर तो लवचिकपणा येईल'' हे रा.भा. पाटणकर यांचे मत योग्य आहे असे

वाटते. पण त्या-त्या वाङ्मयप्रकाराच्या वैशिष्ट्यांनुसार काही निकष महत्त्वाचे म्हणून अग्रक्रमाने विचारात घ्यावे लागतात. कांदबरी या वाङ्मयप्रकाराबाबत सर्वात महत्त्वाचे म्हणून दोन मूल्यनिकष विचारात घ्यावे लागतील. ते म्हणजे १) वास्तवता २) लेखकाची नैतिकदृष्टी किंवा लेखकाचा जीवनविषयक मूल्यविवेक.

वास्तवता हा कादंबरीचा व्यवच्छेदक निकष म्हणून मानण्यात अडचण येऊ शकते कारण तो मानल्यास वास्तवचित्रणात्मक नसणाऱ्या रंजनवादी किंवा रहस्यमय कादंबऱ्या 'कादंबरी' या वर्गात घालताच येणार नाहीत. पण जेव्हा कलात्मक कादंबरी म्हणून विचार करू लागतो तेव्हा वास्तवता हे एक महत्त्वाचे मूल्य स्वीकारावे लागते. साहित्यातील वास्तवता या संकल्पनेविषयी गंगाधर गाडगीळ म्हणतात ''साहित्यात वास्तवतेचे चित्रण व्हायचे व तिचा अर्थ लावायचा म्हणजे दोन गोष्टी आवश्यक असतात. एक अशी की लेखकाची भूमिका वस्तुनिष्ठ हवी आणि दुसरी अशी की, त्याने कलाकृतीतून एका विशिष्ट घटनेचे चित्रण न करता सर्वसामान्य स्वरूपाची विधाने केली पाहिजे.'' साहित्यातून वास्तवाचे चित्रण होत असते याचा अर्थ लेखकाची भूमिका वस्तुनिष्ठ असते हे म्हणणे बरोबर वाटत नाही. कारण लेखकाची भूमिका पूर्णपणे वस्तुनिष्ठ असेल तर त्याचे लेखन साहित्य न होता शास्त्रच होईल किंवा वर्तमानपत्री वृत्तांत होईल म्हणून साहित्यात वास्तवचित्रण करणे म्हणजे लेखकाची भूमिका वस्तुनिष्ठ असणे नव्हे किंवा सर्वसामान्य स्वरूपाची विधाने करणे नव्हे. एकूण गाडगीळाचे साहित्यातील वास्तवतेबद्दलचे मत पटण्याजोगे नाही असे म्हणावे लागते. ''आपल्या शिवायही सृष्टीचे अस्तित्व असू शकते, हे सत्य (वास्तव) वस्तुनिष्ठतेने जाणणे म्हणजे वास्तववाद''[२७] ही भालचंद्र नेमाडेची भूमिका आहे.

पाटणकर म्हणतात, ''वाङ्मयकृती आणि वास्तव यात साम्य असते, वाङ्मयकृती ही वास्तवाचे प्रतिक असते. या प्रतीकाचे भाग (म्हणजे पात्रे, घटना, वातावरण इत्यादी) स्वत: प्रतीकरूप असतात. पुन्हा या भागांचे परस्परसंबंधदेखील जीवनातील तत्समान गोष्टीतील संबंधासारखे असतात... अशा रीतीने सर्व कलाकृतीलाच प्रतीक किंवा प्रतीक-रचना मानता येते. त्यातील घटक व प्रत्यक्ष जीवनातील घटक यांच्यात साम्य आहे, त्याचप्रमाणे कलाकृती व जीवन या दोघात अंतर्गत रचनेचे साम्य आहे.'' पाटणकरांनी मांडलेला हा निष्कर्ष लक्षात घेता साहित्यकृतीच्या विशेषत: व्यामिश्र जीवनाशय मांडणाऱ्या कादंबरीसारख्या वाङ्मयप्रकाराच्या समीक्षेत वास्तवचित्रण ही संकल्पना महत्त्वाची ठरते. यात शंका नाही. कारण मानवी जीवनावर प्रकाश टाकणे हे साहित्याचे कार्य आहे. वास्तवाबद्दलच्या संकल्पना जरी बदलत गेलेल्या वाटत असल्या तरी साहित्याचे वरील कार्य-भूमिका कायमच राहिलेली आहे.

या विवेचनावरून कादंबरीच्या संदर्भात 'वास्तवता' हा निकष स्वीकारणे गैर नाही असे म्हणता येते. वाङ्मयीन वास्तवते विषयीचा मुद्दा रा.भा. पाटणकर यांनी अधिक चांगल्याप्रकारे स्पष्ट केला आहे. तो असा, ''वाङ्मयात व वास्तवात साम्य असते असे म्हणणे म्हणजे केवळ वास्तववादी तंत्राचा पुरस्कार करणे नव्हे. वास्तवाचे प्रतिक कसे बनवायचे याबाबत लेखकाला स्वातंत्र्य असते. तो वास्तववादी लेखनतंत्र वापरून माणसे प्रत्यक्षात जशी असतात तशीच पात्रे निर्माण करील. पण काहीवेळा तो अदभुतरम्यतेचा उपयोग करील किंवा केव्हा-केव्हा अतिशयोक्तीचा व न्यूनोक्तीचा उपयोग करील. काही वेळा तो कालानुक्रमे सलग गोष्ट सांगेल तर काही वेळा तो प्रसंगाचे सुटे तुकडे मुद्दाम विस्कळीत रीतीने एकमेकांना जोडेल याचा अर्थ असा की वाङ्मयात वास्तवाचे चित्रण असते की नाही हे नुसत्या तंत्रावर अवलंबून नसते.'' पाटणकर पुढे म्हणतात, ''दिवास्वप्नासारखी कादंबरी वास्तवाविषयी सत्यज्ञान देत नाही अशी कादंबरी आपली फसवणूकच करते. तिचा काही भाग वास्तवदर्शी असतो आणि उरलेला भाग स्वप्नरंजनात्मक असतो. स्वप्नरंजनात्मक भाग ही वास्तववादी माना असे ती आपल्याला आवाहन करते.''

रा.भा. पाटणकर यांनी केलेल्या या विवेचनावरून वाङ्मयीन वास्तवतेबद्दलच्या कल्पना अधिक स्पष्ट होतात. सारांश, कादंबरीचे आशयद्रव्य हे वास्तवातूनच घेतलेले असून मानवी जीवनाविषयी काही तरी

सांगण्याच्या, जीवनाबद्दलचे स्वत:चे आकलन व्यक्त करून वाचकाच्या मनात वास्तवाविषयी काही एक जाणीव निर्माण करण्याच्या हेतूने कादंबरीकार कादंबरी लिहीत असतो. म्हणून वास्तवता किंवा जीवनदर्शन हा कादंबरीच्या मूल्यमापनाचा महत्त्वाचा निकष मानावा लागतो. कादंबरीकार मानवी जीवनातील प्रश्नांना किती खोलवर भिडतो, वास्तवाचे किती व्यामिश्र दर्शन तो घडवू शकतो यावरून त्याच्या कादंबरीचे श्रेष्ठत्व ठरविता येते. मानवी जीवन म्हणजे केवळ व्यक्तिजीवन नव्हे, तर व्यक्ती आणि तिचे सामाजिक, सांस्कृतिक व नैसर्गिक पर्यावरण मिळून मानवी वास्तव बनत असते. वास्तवाच्या या व्यापक रूपाचे कादंबरीकार कितपत आकलन करतो याचाही विचार कादंबरीच्या संदर्भात करावा लागतो.

कादंबरीच्या आकलन-मूल्यमापनासाठी वापरावा लागणारा दुसरा महत्त्वाचा निकष म्हणजे लेखकाची नैतिकता हा होय. नैतिकता म्हणजे लेखकाची जीवनदृष्टी किंवा वास्तवासंबंधीचा त्याचा मूल्यविवेक असे म्हणता येईल. वास्तवता आणि नैतिकता या दोन्ही संकल्पना एकमेकीशी घनिष्ठपणे निगडीत झालेल्या असतात. त्यामुळे कादंबरीतील वास्तवतेचा विचार करु लागल्यानंतर अपरिहार्यपणे लेखकाच्या नैतिकतेचाही विचार करावा लागतो. साहित्याची निर्मिती करताना कोणताही लेखक अलिप्त असत नाही. त्या साहित्यनिर्मितीमागे लेखकाचे व्यक्तिमत्त्व जुटलेले असते. व्यक्तिमत्त्व ही गोष्ट माणसाच्या जगण्याविषयीच्या संकल्पना, मूल्यविवेक,दृष्टिकोन यांनीच बनलेली असते. साहित्यकृतीतून लेखकाचे व्यक्तिमत्त्व व्यक्त होत असते याचा अर्थ तिच्यातून लेखकाच्या जीवनविषयक मूल्यसंकल्पनाच व्यक्त होत असतात, असे मानावे लागते.

कादंबरीतून वास्तवाचे चित्रण करताना वास्तवासंबंधी काही ना काही भूमिका लेखकाला घ्यावीच लागते.अमूक एक वास्तव घटना किंवा व्यक्तीचे वर्तन हे चुक आहे किंवा बरोबर आहे, एवढे तरी किमान सांगावे लागते. वास्तवाकडे अशा भूमिकेतून पाहणे म्हणजेच मूल्यविवेक होय आणि लेखकाकडे स्वत:ची अशी काही मूल्यदृष्टी असल्याशिवाय हा विचार करता येणार नाही. लेखकाजवळ अशी मूल्यमापनाची व्यवस्था, भूमिका असल्याशिवाय वास्तवाचे आकलन तो करू शकणार नाही. ही मूल्यव्यवस्था म्हणजेच नैतिकता होय. लेखकाने स्विकारलेली ही मूल्यव्यवस्था म्हणजे त्याच्या एकूण जीवनजाणिवेचा भाग असतो. ही जीवनजाणीव म्हणजे लेखक आणि त्यांचे बाह्यविश्व यांच्या संबंधातून निर्माण झालेले एक समग्र चित्र असून साहित्यकृतीच्या रचनेचे एक महत्त्वपूर्ण तत्त्व म्हणून या जीवनजाणिवेचा विचार करावा लागतो.

लेखकाची नैतिकता किंवा जीवनदृष्टी हाच कादंबरीच्या वाङ्मयीन महात्मतेचा महत्त्वाचा निकष आहे, ही भूमिका अनेक अभ्यासकांनी मांडलेली आहे. उदा. चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, ‘‘कादंबरी वाङ्मयप्रकारात लेखकाची जीवनदृष्टी महत्त्वाची असते. या जीवनदृष्टीच्या व्यापकतेवर/सखोलपणावर आणि मौलिकतेवर लेखकाची महत्ता अवलंबून असते. ही जीवनदृष्टी संपन्न बनवण्यात लेखकाचे सूक्ष्म जीवननिरीक्षण, माणसांच्या मनोव्यापाराच्या गुंतागुंतीचे त्याचे ज्ञान, जीवनव्यापाराचे त्याचे आकलन या गोष्टी सक्रिय असतात.’’

रा. भा. पाटणकर यांनीही जीवनदृष्टी हाच वाङ्मयीन महत्तेचा निकष मानलेला आहे. ते म्हणतात,‘‘महान वाङ्मयीन कलाकृतीमध्ये मानवी जीवनाचा अर्थ काय?’’ ‘‘विश्वाच्या अफाट पसाऱ्यात मानवी मूल्याचे स्थान काय?’’ इत्यादी प्रश्न हाताळलेले असतात. या प्रश्नांची उकल वैज्ञानिक पातळीवरून होत नसून वैचारीक पातळीवर होते. म्हणून त्यांची उत्तरे देताना लेखक आपल्यासमोर ज्ञानात्मक विधाने ठेवीत नाही. तो आपल्याला एक जीवनदृष्टी देतो. या जीवनदृष्टीत वैचारिकता,मूल्यात्मकता व भावनात्मकता हे तीन घटक असतात. म्हणून ती आपल्या जीवनाच्या व व्यक्तित्वाच्या अनेक अंगांना स्पर्श करते.’’

आणि एके ठिकाणी पाटणकर म्हणतात,‘‘ज्यात जीवनार्थाचा आशय नाही असे संगीत,चित्र, शिल्प हे न-नैतिक व म्हणून अलौकिक होऊ शकते. पण वाङ्मय मात्र न-नैतिक होऊ शकत नाही. ‘नैतिकते’च्या

व्यापक अर्थाने वाङ्‌मय नैतिकच असते. तसे असणे हा त्याचा स्वभाव आहे... वाङ्‌मय जीवनाचे दर्शन घडवते असे आपण म्हणतो या जीवनदर्शनाला नैतिकतेचे अंग असते हेही आपण लक्षात ठेवले पाहिजे.''

कादंबरीतील नैतिकतेच्या आविष्काराबद्दल भालचंद्र नेमाडे यांनी पुढीलप्रमाणे मत मांडलेले आहे,''कादंबरीकार वास्तवातील कोणत्या घटनापात्राची तपशीलाची निवड त्यांच्या आशयसुत्रानुरूप करतो, त्यातून त्याचा मूल्यविवेक दिसतो. अशा अनेक तपशीलातून कादंबरीकाराची नैतिकता सिद्ध होते.'' यावरून कादंबरीतील नैतिकता ही कादंबरीवर बाहेरून लादण्याची बाह्य अशी गोष्ट नसून कादंबरीच्या रूपनिर्मितीतच ती अनुस्यूत असते असे म्हणता येते. अनिष्ट सामाजिक रूढीपुढे मोडून पडलेली यमू किंवा समाजसुधारणेच्या ध्येयवादाला वाहून घेतलेला भावानंद यासारखी पात्रे आपल्या कादंबऱ्यांतून निर्माण करणाऱ्या हरिभाऊंची नैतिकता या पात्रांच्या निवडीतूनच स्पष्ट होते. याउलट फडके-माडखोलकर यांनी आपल्या कादंबऱ्यांसाठी निवडलेली कथानके, उच्चभ्रू, देखणी, उथळ व कृतिशून्य पात्रे आणि कृत्रिम नटवी भाषा यावरून या लेखकांकडे कोणतीही 'गंभीर' नैतिक भूमिका नाही, हे सिद्ध होते. त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्या रंजनवादी ठरतात.

कादंबरीच्या संकल्पनासंबंधी विवेचन रंगनाथ पठारे यांनी मांडलेले आहे. पठारे यांच्या मते,''कादंबरीची संकल्पना म्हणताना मला कादंबरीचा आकार, रचना, घाट, एकूण कादंबरीविषयीची आपली कल्पना, तिने काय द्यावे, कसे द्यावे, तिच्यात काय असावे, कसे असावे, तिचा उद्देश काय अशा साऱ्या गोष्टीसंबंधी म्हणायचे आहे. या साऱ्या अंगानी अमाप खुलेपण असूनही तिचा बंध तयार होतोच आणि अशा बंधाची पठडी तयार होत नाही याचे कारण सतत बदलता स्थलकाल, त्यातली नित्यनूतन माणसे, बदलते प्रश्न आणि प्रत्येक काळाचा बदलता स्वर या साऱ्याचे पडसाद तिच्या रचनेत उमटतात व म्हणून तिची संकल्पना प्रवाही असते. लेखकाच्या जीवनविषयक प्रकट/अप्रकट धारणाचा प्रभाव त्यांच्या निर्मितीवर अवश्य पडतो. तरीही कादंबरीसारखे अद्‌भूत रसायन तयार होताना त्याच्या जाणिवेच्या पातळीवर प्रकट नसलेल्या अनेक गोष्टी निर्मितीत उतरत असतात. प्रभावी असे काही ठरवून निर्माण होत नाही. पण ते झाले की, त्या अनुषंगाने सारा पुनर्विचार करावा लागतो. असा पुनर्विचार करावा लागणे हे संकल्पनेच्या प्रवाहीपणाचे मुख्य लक्षण मानले पाहिजे. कादंबरीकाराची कादंबरीविषयीची संकल्पना त्याच्या लेखनाची प्रवृत्ती, प्रकट होण्याची रीत यातून बऱ्यापैकी स्पष्ट होत असते.''

या सर्व विवेचनावरून शेवटी आपणास असा निकर्ष काढता येईल की, कादंबरी ही पात्रे घटना, निवेदन, भाषा इ. घटकांची संघटना असते. असे मानले तर कलात्मक कादंबरीमध्ये या घटकांची संरचना लेखकाची जीवनदृष्टी किंवा नैतिकता या तत्त्वानुसार झालेली असते, सेंद्रिय एकतेसारख्या तत्त्वानुसार नव्हे, म्हणून नैतिकता हेच कलात्मक कादंबरीचे संघटनातत्त्व होय. ज्या कादंबरीमध्ये नैतिकता हे संघटनतत्त्व सापडत नसेल तिला उच्च दर्जाची वाङ्‌मयीन गुणवत्ता असलेली कलात्मक कादंबरी म्हणता येणार नाही. कादंबरीतील नैतिकता कितपत प्रगल्भ आहे? वास्तवाच्या आकलनाचा तिचा परीघ संकुचित आहे की विस्तृत आहे. रूढ स्थितिशील नैतिक मूल्यांची दडपणे झुगारून ती कितपत स्वतंत्र आणि गतिशील बनलेली आहे, यावरून कादंबरीच्या श्रेष्ठत्वाचे मूल्यमापन आपणास करता येते.

कादंबरीच्या आकलन-मूल्यमापनासाठी वास्तवता आणि नैतिकता हे दोन निकष वापरणे महत्त्वाचे व अपरिहार्य आहे. या दोन निकषांशिवाय कादंबरीकाराने आपल्या हेतुसिद्धीसाठी वापरलेली तंत्रे व त्याची परिणामकारता, शैली, व्यक्तीचित्रण व प्रसंगवर्णन यातून प्रकट होणारे त्याचे निवेदनकौशल्य, त्याने केलेला भाषेचा वापर इ. गोष्टींचाही आपणास विचार करावा लागतो. हा विचार कादंबरीतील वास्तवता आणि नैतिकता या दोन निकषांशीच निगडीत असतो, हेही लक्षात ठेवावे लागते.

**संदर्भः**


- नेमाडे भालचंद्र : 'टीकास्वयंवर', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. १९९०, पृ.१७०
- पाटणकर रा.भा. : 'सौंदर्यमीमांसा', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, द्वि.आ.१९८१, पृ. ४०
- फडके भालचंद्र : 'मराठी कादंबरी', *प्रदक्षिणा' खंड-१*, (संपा) कुलकर्णी अनिरुद्ध, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण १९९७, पृ. २१५
- पठारे, रंगनाथ : 'अनुष्टुभ', मे-जून २००३, नाशिक, पृ. १३
- राजवाडे वि.का. : 'कादंबरी', *लेखसंग्रह* (संपा) लक्ष्मणशास्त्री जोशी, साहित्य अकादमी, नवी दिल्ली, द्वि.आ., १९८९, पृ. ३००
- देशपांडे अ.ना. : 'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास', खंड-१, व्हीनस प्रकाशन, पुणे, द्वि.आ. १९९२, पृ.१७५
- गाडगीळ गंगाधर : 'खडक आणि पाणी', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, द्वि.आ.१९६६, पृ. ५९
- बांदिवडेकर चंद्रकांत : 'मराठी कादंबरीचा इतिहास', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्र.आ. १९८९, पृ.१२